CAPACIT'E
INFRAPROJECTS LIMITED

Ref : CIL/STEX 47/Q2FY19
Date : August 02, 2018

To

| | |
|---|---|
| The Secretary,<br>BSE Limited<br>Corporate Relationship Dept,<br>P.J. Towers,<br>Dalal Street, Fort,<br>Mumbai-400 001<br>Scrip Code – /Scrip Id: 540710/CAPACITE | The Secretary,<br>National Stock Exchange of India Limited<br>Plot No.C/1, G Block,<br>Bandra Kurla Complex<br>Bandra (East)<br>Mumbai-400 051<br>Scrip Symbol: CAPACITE |

Dear Sir/ Madam,

**Sub: Intimation of publication of notice for Board Meeting – August 09, 2018**

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are submitting herewith newspaper clippings of notice of Board Meeting published in the following newspapers:

1. Financial Express (National Daily Newspaper) on August 02, 2018
2. Tarun Bharat (Daily Newspaper of the State) on August 02, 2018

This is for your kind information and records.

Thanking you,

Yours faithfully,
For **Capacit'e Infraprojects Limited**

CAPACIT'E INFRAPROJECTS LIMITED

**Sai Kedar Katkar**
Company Secretary & Compliance Officer

# ‘विद्यानिधी इन्फोटेक’चे नामकरण



**मुंबई, दि. १ (प्रतिनिधी):** शिक्षणतज्ज्ञ श्रीराम मंत्री यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त जुहू येथील विद्यानिधी शैक्षणिक संकुलाचे नामकरण करण्यात आले. आता हे शैक्षणिक संकुल 'श्रीराम मंत्री विद्यानिधी इन्फोटेक अकॅडमी' या नावाने ओळखले जाणार आहे. हा नामकरण सोहळा राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते श्रीराम मंत्री यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमास नागालँडचे राज्यपाल पद्मनाभ आचार्य, उपनगर शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष संजीव मंत्री, डॉ. किर्तीदा मेहता, रमेश मेहता, विनायक दामले, तसेच माजी विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना विनोद तावडे म्हणाले की, ''माझा व श्रीराम मंत्री उपाख्य रामभाऊ यांचा परिचय माझ्या विद्यार्थीदशेपासून आहे. मंत्रिपद मिळाल्यावर मी सर्वप्रथम श्रीराम मंत्री यांना भेटलो. त्यांचा गुणवत्तेवर भर देणे आणि विद्यार्थी संवाद साधणे, हा सल्ला मी आजही स्मरणात ठेवला आहे.'' यावेळी तावडे यांनी राज्य शासनातर्फे पुढील वर्षापासून श्रीराम ग्रंथ महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याचेही सुतोवाच केले.

नाना पाटेकर यांनी मंत्री यांच्याबद्दल विशेष आठवणी सांगितल्या. तसेच पाटेकर यांनी त्यांच्या नाट्य कारकिर्दीचा श्रीगणेशा हा मंत्री यांच्यामुळे झाल्याचे विशेषत्वाने नमूद केले. राज्यपाल पद्मनाभ आचार्य यांनी मंत्री यांच्या देशप्रेमाने ओतप्रोत निःस्पृह जीवनपटाचे कथन केले. तसेच ते पुढे म्हणाले की, ''आज समाजात शिक्षणसम्राट अनेक आहेत. मात्र, श्रीराम मंत्री यांच्यासारखा वंचितांना शिक्षण देणारा शिक्षणमहर्षी सापडणे अवघड आहे.'' पद्मनाभ आचार्य यांनी मंत्री यांचा 'सुसंस्कारांचे विद्यापीठ' अशा शब्दांत गौरव केला.

कार्यक्रमाच्या आयोजनात नाट्यदिग्दर्शक मंगेश कदम, कलादिग्दर्शक विनोद गुरुजी, गेगरी फर्नांडिस, योगेश केवळेकर, जयवंत राऊत, अशोक मोघे आदींनी मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश दुबे व स्वप्नाली साळवे यांनी केले.

### श्रीराम मंत्री (१९२३-२०१७) यांचा अल्पपरिचय

वेंगुर्ले येथे शालेय शिक्षण झालेल्या श्रीराम मंत्री यांचे महाविद्यालयीन शिक्षण मुंबई येथे झाले. वंचितांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, या विचाराने १९५६ मध्ये उपनगर शिक्षण मंडळाची त्यांनी स्थापना केली. तसेच, १९७१ मध्ये जुहू येथे विद्यानिधी शैक्षणिक संकुल स्थापन केले. तसेच त्यांचा भारतीय शिक्षण मंडळ, विद्या प्रतिष्ठान महाराष्ट्र, विद्याभारती, केशवसृष्टी, विद्याभारती पश्चिमांचल, अमल विद्यावर्धिनी अशा विविध संस्थांमध्ये त्यांचे मोलाचे योगदान होते. शैक्षणिक व सामजिक विषयांवर त्यांनी विपुल लिखाण केले, तसेच त्यांना डॉ. हेडगेवार प्रतिष्ठानमार्फत 'गुरुमूर्ती' सन्मान तसेच इतर अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

# ५०० कोटींचा भूखंड घोटाळा

## स्थायी समितीत जोरदार खडाजंगी

**मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) :** जोगेश्वरीतील रुग्णालय आणि मनोरंजन मैदानासाठी आरक्षित असलेल्या ५०० कोटींचा भूखंड घोटाळा समोर आला. त्यावरून आज स्थायी समितीच्या बैठकीत जोरदार खडाजंगी झाली. याप्रकरणी भाजपच्या गटनेत्यांनी ठराव मांडून अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली. तसेच सर्वपक्षीय नगरसेवकांनी याप्रकरणी संताप व्यक्त करत भूखंड बिल्डरांच्या घशात घालणाऱ्या विधी खाते व विकास नियोजन विभागातील अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून त्यांची निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करावी, अशी मागणी केली. स्थायी समिती अध्यक्षांनी हे प्रकरण गंभीर असल्याने सर्व कागदपत्रे सील करून कारवाईचे आदेश दिले. दरम्यान, या गदारोळामुळे सभा तहकूब करण्यात आली. रस्ते, नालेसफाई घोटाळे गाजत असतानाच आता भूखंड घोटाळा उघड झाल्याने पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मुंबईच्या विकास आराखड्यामध्ये जोगेश्वरी येथील १३ हजार चौरस मीटरचा भूखंड मनोरंजन मैदान, रुग्णालय आणि रस्त्यांसाठी आरक्षित केला होता. परंतु, प्रशासनाने ठराविक कालावधीत तो भूखंड ताब्यात न घेतल्याने ५०० कोटींच्या भूखंडावर पालिकेला पाणी सोडावे लागले. बुधवारी स्थायी समितीत हा मुद्दा उपस्थित करून प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. सपा गटनेते रईस शेख यांनी या भूखंडाप्रकरणी दोन महिन्यांपूर्वी पत्रव्यवहार करून भूखंड घोटाळा होण्याची भीती व्यक्त केली होती. त्यानंतरही प्रशासनाने काहीच हालचाली न केल्याने भूखंड सोडून देण्याची नामुष्की पालिकेवर ओढवल्याचा आरोप शेख यांनी केला. सर्वपक्षीय नगरसेवकांनी या मुद्द्याचे समर्थन करीत विधी खाते व विकास नियोजन विभागावर ताशेरे ओढले. मुंबईतील भूखंड विकासकांनी लाटण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. भविष्यात यात वाढ होण्याची भीती नगरसेवकांनी व्यक्त केली. तसेच पालिकेचे अधिकारी महापालिकेचे वेतन घेऊन विकासकांची कामे करतात असा त्यांच्यावर आरोप आहे. जोगेश्वरीतील भूखंड प्रकरणातही अधिकाऱ्यांचे आर्थिक संगनमत झाल्याचे आरोप नगरसेवकांनी केले. त्यामुळे याप्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे, अशी मागणी सर्वपक्षीय नगरसेवकांनी केली. सभागृहनेत्या विशाखा राऊत, विरोधी पक्षनेता रवी राजा, भाजप गटनेते मनोज कोटक आदी नगरसेवकांनी विधी खाते व विकास नियोजन खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत हलगर्जीपणावर संताप व्यक्त केला. हा प्रकार समोर आल्यानंतर उपायुक्तांमार्फत चौकशी करण्यात येणार आहे. मात्र, एवढा मोठा घोटाळा असताना उपायुक्त चौकशी काय करणार, असा सवाल विचारला. उपायुक्त निःपक्षपणे चौकशी करतील का? हा प्रश्न असल्याने ही चौकशी निवृत्त न्यायाधीशामार्फत करावी, अशी एकमताने मागणी करत प्रशासनाची कोंडी करण्यात आली. संतप्त झालेल्या नगरसेवकांनी प्रशासनाचा मुद्दा खोडून काढत, संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची व त्यांची निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशीची मागणी लावून धरली. यावर स्थायी समिती अध्यक्ष यशवंत जाधव यांनी चौकशी होईपर्यंत अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले.

### निधी चौधरी यांच्यामार्फत चौकशीही सुरू

या प्रकरणात विधी खात्यामधील काही अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दिरंगाई केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे उपायुक्त (विशेष) निधी चौधरी यांच्यामार्फत चौकशीही सुरू करण्यात आली आहे. या प्रकणात जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. या जागी आरक्षणाप्रमाणे मनोरंजन मैदान आणि रुग्णालय होण्यासाठी पालिकेडून पुर्नविचार याचिका दाखल करण्यात येईल, असे पालिका अतिरिक्त आयुक्त आय. ए. कुंदन यांनी स्पष्ट केले. तसेच या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे सांगत प्रशासनाची बाजू सावरण्याचा प्रयत्न केला.

# स्वच्छतेसाठी पश्चिम रेल्वेचे आधुनिक पाऊल

## व्हॉट्सॲपवर अस्वच्छतेचे फोटो पाठवण्याचे आवाहन

**मुंबई, दि. १ (प्रतिनिधी):** स्वच्छता हा मंत्र जपत त्यासाठी पश्चिम रेल्वेने तंत्रज्ञानाची कास धरत आधुनिक पाऊल टाकले आहे. त्यासाठी प्रवासाप्रसंगी अस्वच्छतेचे दर्शन झाल्यास त्याचे फोटो व्हॉट्सॲपवर प्रवाशांनी पाठवावे, असे आवाहन पश्चिम रेल्वेच्यावतीने करण्यात आले आहे. यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने विशेष सुविधा सुरू केली आहे. रेल्वेने यासाठी एक व्हॉट्सॲप क्रमांक दिला असून त्यावर हा फोटो पाठविल्यास प्रशासनाकडून त्याची दखल घेतली जाणार आहे. त्यामुळे स्टेशनवरील स्वच्छतेसाठी प्रवासी आपले योगदान देऊ शकणार आहेत.

या नव्या प्रयोगामुळे पश्चिम रेल्वेची स्थानके आणि त्याठिकाणी असणारी स्वच्छतागृहे स्वच्छ राहण्यास मदत होईल, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. यासाठी २४ तास वेगळ्या कर्मचारीवर्गाची नेमणूक करण्यात आली असल्याचे प. रेल्वेच्या वतीने सांगण्यात आले. तक्रार दाखल झाल्यानंतर रेल्वे प्रशासन या फोटोची दखल घेत लगेचच त्याठिकाणी स्वच्छता व्हावी यादृष्टीने कार्यवाही करणार आहे. ही यंत्रणा योग्य पद्धतीने कार्यरत व्हावी, यासाठी स्टेशन प्रबंधक आणि इतर अधिकाऱ्यांसोबत काही दिवसांपासून चर्चा सुरू असल्याचे पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबईतील पश्चिम रेल्वेबरोबरच अन्य पाच विभागांसाठीही ही सुविधा करण्यात आली आहे.

**असे आहेत शहरांसाठीचे क्रमांक**

| शहर | क्रमांक |
|---|---|
| मुंबई | ९००४४९९७३३ |
| बडोदा | ९७२४०९१४२६ |
| अहमदाबाद | ९७२४०९३९८१ |
| भावनगर | ९७२४०९७९६७ |
| राजकोट | ९७२४०९४९८३ |
| रतलाम | ९७५२४९२९७० |



▶ **मुंबई:** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ९८व्या जयंतीनिमित्त मंत्रालयात त्यांना अभिवादन करताना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत, वस्त्रद्योग राज्यमंत्री अर्जुन खोतकर, समाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे आदी उपस्थित होते.

# ९ हजार ७७६ कोटींची प्रशासकीय मान्यता

## रस्त्यांची कामे जलदगतीने करण्याचे ग्रामविकासमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) :** 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजनें'तर्गत आतापर्यंत ३ हजार २२१ कामे मंजूर करण्यात आली आहेत. यातून ग्रामीण भागात १६ हजार २२९ किमी इतक्या लांबींच्या रस्त्यांची निर्मिती आणि काही रस्त्यांचा दर्जा सुधारण्याचे काम करण्यात येणार आहे. यासाठी ९ हजार ७७६ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यताही देण्यात आली आहे. आतापर्यंत करण्यात आलेल्या कामांमधून अनेक गावांमध्ये उत्तम रस्ते तयार करण्यात आले असून यापुढील काळात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेला अधिक गती देणे आवश्यक आहे. कार्यकारी अभियंत्यांनी त्यादृष्टीने कामाचे नियोजन करावे. पावसाळ्यात प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया आदी कामे करण्यात यावीत, त्यानंतर रस्त्यांच्या प्रत्यक्ष बांधकामाला गती देण्यात यावी, अशा सूचना ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या. या योजनेसंदर्भात बुधवारी सह्याद्री अतिथीगृहात आढावा बैठक पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. या योजनेतून ७ हजार ६०० किमी लांबीच्या कामांपैकी आतापर्यंत साधारण ५ हजार ८०४ किमी लांबींची कामे पूर्ण झाली आहेत.

# खोट्या बातम्या पसरवण्यात सामाजिक माध्यमे अधिक घातक

## खोट्या बातम्यांची सत्यता पत्रकारांना पडताळावी

**बालसिंग राजपूत यांचे मत**

**मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) :** सध्या सामाजिक माध्यमांमधील इन्संस्ट मेसेजिंग साधनांमध्ये खोट्या बातम्या पसरविण्याची जास्त क्षमता आहे. त्यामुळे ही साधने जास्त घातक आहेत. या माध्यमातून येणाऱ्या माहितीचा स्त्रोत शोधणे अथवा ती माहिती तयार करणारे शोधणे कठीण आहे. त्यामुळे या संदर्भात लोकांमध्ये जास्तीत जास्त जागृती करणे आवश्यक असून खोट्या बातम्या अथवा 'फेक न्यूज'ची सत्यता तपासून त्या लोकांसमोर आणण्याचे काम पत्रकारांनी करावे, असे आवाहन महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधीक्षक बालसिंग राजपूत यांनी केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्यावतीने 'फेक न्यूज' संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राजपूत बोलत होते. यावेळी मुंबई सायबर सेलचे उपायुक्त अकबर पठाण, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (वृत्त व जनसंपर्क) शिवाजी मानकर, पत्रसूचना कार्यालयाचे अतिरिक्त महासंचालक (पश्चिम विभाग) नितीन वाकणकर, वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे आदी यावेळी उपस्थित होते.

एखादी मूळ घटना अथवा माहितीची मोडतोड करून वेगळा अर्थ काढून ती पसरविण्याचे काम 'फेक न्यूज'च्या माध्यमातून होत असते. ठरविलेल्या अजेंड्यानुसार प्रमोशन करणे, फक्त अफवा पसरविणे, विकृती मनोवृत्ती, फक्त चर्चा करणे, अप्रत्यक्ष बाजारीकरण करणे, दुसऱ्याबद्दल वाईट गोष्टी पसरविणे, बदनामी करणे आणि गुन्हे करणे आदी कारणांसाठी 'फेक न्यूज'चा वापर करण्यात येतो. गेल्या आठ ते दहा वर्षात समाजमाध्यमांचा प्रसार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, त्याचा योग्य वापर करण्याचे तंत्र अद्याप विकसित झाले नसल्याचे राजपूत म्हणाले. तसेच सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून 'फेक न्यूज' मोठ्या प्रमाणात पसरविण्यात येत आहे. 'फेक न्यूज'ची मूळ पोस्ट तयार करणारे शोधण्यासाठी यंत्रणा उभारण्याचे काम सुरू आहे. परंतु या समाजमाध्यमांचे मुख्यालय किंवा कार्यालये ही परदेशात असल्यामुळे कायदेशीर कार्यवाही करण्यास अडचणी येतात. तरीही समाजमाध्यमांद्वारे अफवा पसरविणाऱ्याविरुद्ध पोलीस मोठ्या प्रमाणात कारवाई करत आहेत. एखादी अफवा अथवा खोटी बातमी समाजमाध्यमात आली असल्यास तातडीने पोलिसांना ती माहिती द्यावी. 'फेक न्यूज' आल्यास पत्रकारांनी त्याबद्दल जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले

### गुगल, फेसबुकची कार्यशाळा

'फेक न्यूज' संदर्भात गुगल व फेसबुक पत्रकारांसाठी एक कार्यशाळा घेणार आहे. यामध्ये पत्रकारांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# खासगी बाजार समिती, ई-नाम जोडणी आवश्यक

**मुंबई, दि. १ (प्रतिनिधी) :** खासगी बाजार समित्यांनी 'ई-नाम'शी जोडणी करण्याचे निर्देश सहकार व पणनमंत्री सुभाष देशमुख यांनी दिले. कृषिमालाला चांगला दर मिळावा यासाठी ही नोंदणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हिंगोली आणि वाशीम जिल्ह्यातील खासगी बाजार समित्यांच्या प्रतिनिधींची बैठक बुधवारी पार पडली. यावेळी ते बोलत होते.

**CAPACIT'E INFRAPROJECTS LIMITED**

**Regd Office:** 605-607, Shrikant Chambers, Phase-I, 6th Floor, Adjacent to R. K. Studios, Sion- Trombay Road, Mumbai- 400 071. **CIN:** L45400MH2012PLC234318
**Contact No:** 022 - 71733717; **Website:** www.capacite.in; **Email id:** compliance@capacite.in

**NOTICE**

Notice is hereby given pursuant to Regulation 29(1)(a) & (e) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that, a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Thursday, August 9, 2018 at the registered office of the Company situated at 605-607, Shrikant Chambers, 6th Floor, Phase-I, Adjacent to R. K. Studios, Sion - Trombay Road, Mumbai- 400 071, inter-alia, to consider, approve and take on record the Unaudited Financial Statements (Standalone) for the Quarter ended June 30, 2018 along with other agenda items.

The trading window of the Company shall remain closed from August 1, 2018 till the expiry of 48 hours after the conclusion of the meeting of the Board of Directors as stated herein.

Information in this regard will also be available, on website of the Company **www.capacite.in**, in due course, as well as on the website of the Stock exchanges **www.bseindia.com** and **www.nseindia.com**

For **Capacit'e Infraprojects Limited**
Sd/-
Sai Kedar Katkar
Company Secretary

Place: Mumbai
Dated: August 1, 2018

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र. डीवाय. सीएच. ई./एमॲन्डई/२०९९/ई. एस. दि. ३१.०७.२०१८

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | मुख्य अभियंता (यांत्रिकी व विद्युत) |
| उप विभाग | उप मुख्य अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पूर्व उपनगरे |
| ई-निविदा क्र. | ७१००१२८०१८ |
| विषय | एस विभागामध्ये टागोर नगर दफनभूमी, विक्रोळी (पूर्व) येथे फाउंडेशनसह संख्या ६ पायर सेट्स बदलण्याचे कार्य. |
| निविदा विक्री | बोलीची सुरुवातीची तारीख व वेळ : दि. ३१.०७.२०१८ रोजी स. ११.०० वा. बोलीची अंतिम तारीख व वेळ : दि. १८.०८.२०१८ रोजी दु. ४.०० वा. |
| ई-निविदा क्र. | ७१००१२८०१० |
| विषय | प्रियादर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकूल, मुलुंड (पश्चिम), टी विभाग येथे एलटी पॅनेल्सचा पुरवठा, प्रतिष्ठापन, चाचणी व क्रियान्वयन. |
| निविदा विक्री | बोलीची सुरुवातीची तारीख व वेळ : दि. ३१.०७.२०१८ रोजी स. ११.०० वा. बोलीची अंतिम तारीख व वेळ : दि. २०.०८.२०१८ रोजी दु. ४.०० वा. |
| वेबसाईट | **http://portal.mcgm.gov.in** |
| संपर्क अधिकारी | |
| ए) नाव | श्री. ए. एन. भोईते |
| बी) कार्यालय दूरध्वनी क्र. | ०२२-२५६४५२८९ ते ९४ विस्ता. ३६२, ३६३ |
| सी) मोबाईल क्र. | ९८६७३२९७८९ |
| डी) ई-मेल आयडी | **aees01.me@mcgm.gov.in** |

सही /-
(श्री. एस. डी. चव्हाण)
उप मुख्य अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पूर्व उपनगरे

पीआरओ/७२९/जाहि./२०१८-१९

जेथे जेथे पाणी साचते तेथे तेथे डासांचे फावते

**जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लिमिटेड**
'नंदधाम', लोकमान्य टिळक मार्ग, बोरिवली (पश्चिम), मुंबई- ४०० ०९२.

**३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

बँकेच्या सर्व मान्यवर सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार, दि. १७ ऑगस्ट २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता, पॅराडाईज बँक्वेट हॉल, डी. एम. हायस्कूल, दौलत नगर रोड क्र. १०, बोरिवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६** येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. दिनांक १२ ऑगस्ट २०१७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च २०१८ अखेर संपलेल्या वर्षाचा संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक, लेखापरीक्षकांचा अहवाल स्वीकृत करणे.
३. कायदा, नियम व उपविधींनुसार संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पुर्वपरवानगीच्या अधिन राहून लाभांश घोषित करणे.
४. आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी शासनाने निश्चित केलेल्या लेखापरीक्षकांच्या नामिकेतून (Panel of Auditors) लेखापरीक्षक व्यवसाय संस्थेची निवड तसेच नियुक्ती करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
५. आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी अंतर्गत हिशेब तपासनीस, समवर्ती हिशेब तपासनीस व संगणक तपासनीस यांची नियुक्ती करणे आणि त्यांचा मेहनताना ठरविणे.
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामकाजाचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
**एस. रंगनाथन**
महाव्यवस्थापक

**मुंबई**
**दि. १०.०७.२०१८**

**टीप :-** गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास, सदर सभा बँकेच्या पोटनियम क्र.३५ (iii) प्रमाणे वरील ठिकाणीच अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. तहकुबीनंतरच्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**महत्त्वाच्या सूचना : -**

१. वार्षिक सर्वसाधारण सभेस फक्त बँकेच्या सभासदांनाच, ज्यांचे सभासदत्व दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंतचे आहे, त्यांना उपस्थित राहता येईल.
२. सभासदांनी कृपया सभेस येताना आपले ओळखपत्र आणि हजेरी प्रमाणपत्र सोबत आणावे.
३. ज्या सभासदांनी ओळखपत्रासाठी अर्ज भरून दिलेला नसेल त्यांनी प्रशासकीय कार्यालयात संपर्क करून लवकरात लवकर अर्ज भरून ओळखपत्रे घ्यावीत.
४. ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजाविषयी प्रश्न विचारावयाचे असतील किंवा सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या दिनांक १० ऑगस्ट २०१८ पूर्वी बँकेच्या प्रशासकीय कार्यालयात लेखी स्वरूपात सादर कराव्यात. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
५. ज्या सभासदांनी आपल्या बदललेल्या पत्त्यांची किंवा खात्यांसाठी वारसदारांची (नॉमिनी) नोंद बँकेच्या दप्तरी केली नसेल त्यांनी योग्य बदल/नोंद त्वरीत करुन घ्यावेत.
६. ज्या सभासदांनी आपले भागदाखले अद्यापपर्यंत नेले नसतील त्यांनी ते संबंधित शाखेतून त्वरित घेऊन जावेत.
७. लाभांश जाहीर झाल्यापासून ३ वर्षांच्या आत लाभांश रक्कम सभासदाने न नेल्यास ती पोटनियम क्र. ५८(d) नुसार राखीव निधी मध्ये जमा होते. यानुसार २०१४-२०१५ सालची लाभांश रक्कम अद्याप नेली नसल्यास त्यांनी ती दिनांक ८ ऑगस्ट २०१८ पूर्वी घेऊन जावी.
८. सन २०१७-१८ च्या वार्षिक अहवालाच्या प्रती सर्व शाखांमध्ये उपलबध करुन देण्यात आल्या आहेत. त्याकरिता सभासदांनी नजीकच्या शाखाव्यवस्थापकांशी दि. ३ ऑगस्ट २०१८ नंतर संपर्क साधावा, ही विनंती.
९. बँकेच्या क्रियाशील सभासद (Active Member) होणे किंवा तत्संबंधीचे हक्क अबाधित राहणेकरिता सभासदांच्या नावावर किमान रु. १,५००/-चे भाग व बँकेमध्ये किमान रु. ७,०००/- ची ठेव असावी किंवा रु. १.०० लाखाचे कर्ज असणे आवश्यक आहे. तसेच मागील ५ वार्षिक सर्वसाधारण सभांपैकी किमान एका सभेस उपस्थित असणे आवश्यक आहे. याकरिता ज्या सभासदांच्या भागाची रक्कम रु. १,५००/- पेक्षा कमी असेल आणि ठेव रक्कम रु. ७,०००/- पेक्षा कमी असेल अशा सभासदांनी त्वरीत नजीकच्या शाखेत संपर्क साधावा व उपरोक्त नमूद तीनही बाबींची पूर्तता करून घ्यावी.
१०. सभासदांनी देय लाभांशाची रक्कम त्यांच्या आपल्या बँकेतील खात्यात जमा करण्यासंबंधी कळविले असल्यास, त्यानुसार देय लाभांश रक्कम जमा करण्यात येते. तसेच ज्या सभासदांनी देय लाभांश खात्यात जमा करण्याबाबत कळविलेले नाही. परंतु ज्यांचे आपल्या बँकेत खाते आहे. त्यांच्याही खात्यामध्ये सदर देय लाभांशाची रक्कम जमा करण्यात येईल. ज्या सभासदांचे आपल्या बँकेत बचत खाते नाही त्यांनी ते उघडून बँकेस सहकार्य करावे.

'सबका सपना जनसेवा अपना'